खटला दाखल दिनांक : १३.१२.२०१८
खटला नोंदणी दिनांक : १३.१२.२०१८
खटला निकाल दिनांक : ०५.०८.२०२६
कालावधी : ०७ वर्ष ०७ महिना २३ दिवस

# नांदगाव खंडेश्वर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी, श्री. एस. बी. अंभोरे)

नियमित फौजदारी खटला क्र. १४७/२०१८ नि.क्र. ३०

**फॉर्म क्रमांक–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र सरकार,**<br>व्दारा पोलिस ठाणे अमंलदार,<br>नांदगाव खंडेश्वर, पोलीस स्टेशन,<br>ता. व जि. अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता | वि.सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एम. आर. मालाणी |
| आरोपी/ बचाव पक्ष | **१. शेख नईम शेख नबी**<br>वय – ५१ वर्ष, व्यवसाय –मजूरी<br>**२. शेख बब्बू शेख ईनायत**<br>वय – ४० वर्ष, व्यवसाय –मजूरी<br>दोन्ही रा. फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञः– | श्री. व्ही. ए. कणसे |

गुन्हयाचा तपशील : **फॉर्म क्रमांक–ब**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | २७.११.२०१७ |
| प्रथम खबर दिनांक | २७.११.२०१७ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | १३.१२.२०१८ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १२.११.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक | १२.११.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक | ०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०५.०८.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास | लागू नाही. |

आरोपींचा तपशील : फॉर्म क्रमांक–क

| आ.क्र | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक(फौ.प्र. सं. क्र. ४१–अ प्रमाणे) | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचा तपशील | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ.प्र.सं.कलम ४२८साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेख नईम शेख नबी | २५.०६.२०१८ | २८.०६.२०१८ | भांदवि कलम ३७९ | निर्दोष | निरंक | लागू नाही |
| २ | शेख बब्बू शेख ईनायत | १९.०८.२०१८ | २४.०८.२०१८ | भांदवि कलम ३७९ | निर्दोष | निरंक | लागू नाही |

**फॉर्म क्र.ड**

३. अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार असल्यास :

अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| अ.क्र | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | शैलेश बापूराव गावंडे | फिर्यादी |
| २. | अमोल भैय्यासाहेब देशमुख | घटनास्थळ पंच/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार : निरंक

क. न्यायालयीन साक्षीदार : निरंक

४. अभियोग/ बचावपक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणीबाबत यादी

**अ.अभियोग पक्षाची निशाणी यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | २६ | रिपोर्ट |
| २. | २७ | एफ.आय.आर. |

**ब. बचाव पक्षाने निशांकित केलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क.न्यायालय**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. विशेष साहित्य (Material Object)**

| अ.क्र. | वस्तुला दिलेले क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | ईलेक्ट्रीक मोटर मधील वाईडींग थ्रेटर |

## न्या य नि र्ण य

**(दिनांक : ०५.०८.२०२६ रोजी न्यायालयात घोषीत)**

आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

(प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप हे आरोपी क्र. १ आणि २ यांच्या विरुध्द दाखल करण्यात आले. दिनांक १२.११.२०२५ रोजीच्या आदेशाने आरोपी क्र. २ च्या विरुध्द प्रकरण रद्द करण्यात आले.)

**अभियोग पक्षाची बाजू खालील प्रमाणे –**

०२) फिर्यादी शैलेश बाबुराव गावंडे हे सातरगाव, ता. नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथे राहण्यास

होते. फिर्यादी यांची मौजे सातरगाव येथे एकुण ०३.७५ एकर शेतजमीन आहे. फिर्यादीने त्यांच्या संपूर्ण शेतामध्ये तूर पेरलेली आहे. त्या तुरीला विहीरीतील पानडुबी मोटर पंपाद्वारे पाणी देत होते. दि. २७.११.२०१७ रोजी त्यांनी सकाळी ५.०० वाजता शेतात तुरीला पाणी देण्याकरिता गेले. त्यांनी सकाळी ७.३० वाजेपर्यंत तुरीला पाणी दिले. त्यानंतर विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे फिर्यादी शेतातून घरी परत आले. त्यानंतर सकाळी ५.०० वाजताच्या दरम्यान शेतात ते गेलेअसता शेतामधील विहीरीवर मोटरपंप होता. त्यानंतर दिनांक २८.११.२०१७ रोजी विद्युत पुरवठा सुरु झाल्यामुळे फिर्यादी सकाळी ५.०० वाजता गेले असता विहीरीवरील टेक्समो कंपनीची कंपनीची मोटरपंप किंमत अंदाजे ८०००/- रुपयाची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याचे दिसले. त्यामुळे फिर्यादीने संशयावरुन आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे रिपोर्ट दाखल केला.

०३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, नांदगाव खंडेश्वर येथे आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९, ३४ प्रमाणे गु.र.क्र. २८१/२०१७ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा पंचनामा पंचा समक्ष केला, तसेच तपास अधिकारी यांनी तपासाचे अनुषंगाने सर्व निगडीत साक्षीदारांचे तपास टिप्पण नोंदवून न्यायालयात रितसर दोषारोपपत्र दाखल केले.

०४) माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९,३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप नि.क्र.२६ वर नोंदवला व सदरचे दोषारोप आरोपीला त्याचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन खटल्याच्या संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दाखविली.

०५) प्रस्तुत प्रकरण हे सन २०१८ मध्ये दाखल करण्यात आले. अभियोगपक्षाने फिर्यादी आणि ईतर एका साक्षिदारास तपासले आहे. फिर्यादी आणि साक्षीदार हे फितुर झाले आहे. उर्वरीत साक्षीदारांना वेळोवेळी साक्ष समन्स पाठविण्यात आले. परंतु ते मिळून आले नाही. तर प्रस्तुत

प्रकरणातील महत्वाचे साक्षीदार फितुर झाल्याने इतर साक्षीदार तपासून अभियोगपक्षाला फारसा फायदा होणार नाही म्हणून नि.क्र.०१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६) आरोपी विरुद्ध असलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षामार्फत दोन तपासण्यात आले. परंतु ते फितूर झालेत व अभिलेखावर आरोपी विरूद्ध पुरेसा मजकूर नसल्याने नि.क्र.१ वरील आदेशान्वये आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेले नाही.

०७) आरोपपत्र, अभियोग पक्षाने आणलेला पुरावा पाहता व उभय पक्षांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकता या खटल्याची न्यायचिकित्सा करण्यासाठी माझ्यासमक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले. माझ्यापुढे आलेल्या पुराव्याची न्यायचिकित्सा करुन मी माझे निष्कर्ष त्यापुढे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २८.११.२०१७ रोजी आरोपींनी संगनमताने मौजे सातरगाव येथील शेतातील विहीरीवरील टेस्कमो कंपनीची ५ कि**मी पावरची १५०००/– रुपये ची पानबुडी** मोटार चोरुन नेली आणि त्याद्वारे त्याने भारतीय दंड संहिता कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला काय ? | ........ नकारार्थी |
| ०२ | अंतिम आदेश काय? | ..... निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## **का र ण मी मां सा**

०८) आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी दोन साक्षिदारांना तपासले आहे.

| सा. क्र. | नांव | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | शैलेश बापूराव गावंडे | फिर्यादी |
| २. | अमोल भैय्यासाहेब देशमुख | पंच क्षीदार |

<u>मुद्दा क्र. १ करिता–</u>

०९) आरोपीने शैलेश बापूराव गावंडे यांच्या मालकीचे बेलोरा येथील शेतातील विहीरीवरील टेस्कमो कंपनीची ५ किमी पावरची १५०००/– रुपये ची पानबुडी मोटार चोरुन नेली असे अभियोग पक्षाने सिद्ध करणे गरजेचे आहे.

१०) आरोपी विरुद्ध असलेला दोषारोप शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षिदार क्र. १ शैलेश बापूराव गावंडे यास नि.क्र. २५ वर तपासले. त्यांनी त्यांच्या साक्ष पुराव्या मध्ये असे सांगितले की, त्यांची सातरगाव येथे ७२/१ मध्ये शेती आहे. ते आरोपीला ओळखत नाही. घटना सात वर्षापूर्वी घडली होती. कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यांच्या शेतातील मोटार काढून बाजूला ठेवली होती. त्यामुळे त्यांनी संशयावरुन रिपोर्ट नि.क्र.२६ दाखल केला होता. त्यातील मजकूर त्यांना आठवत नाही. एफ. आय. आर. नि.क्र.२७ वर दाखल आहे. साक्षीदार फितुर झाल्याने अभियोग पक्षाच्या वतीने त्याचा उलटतपास घेण्यात आला. त्यामुळे त्यांनी त्याची मोटरपंप चोरी गेल्याचे नाकारले आहे. आरोपीच्या वतीने घेण्यात आलेल्या उलट तपास घमध्ये मान्य केले की, आरोपीचा घटनेशी काहीही संबंध नाही, त्यांना आरोपी विरुध्द प्रकरण चालविणे नसल्याचे त्यांनी मान्य केले.

११) आरोपी विरुद्ध असलेला दोषारोप शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षिदार क्र.२ अमोल भैय्यासाहेब देशमुख यास नि.क्र.२८ वर तपासले. त्यांनी त्यांच्या साक्ष पुराव्या मध्ये असे सांगितले की, दिनांक २६.०६.२०१८ रोजी पोलीसांनी त्यांना मेमोरंडम पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. त्यांना मेमोरंडम पंचनाम्याबद्दल काही माहिती नाही. मेमोरंडम पंचनाम्यावरील सही त्यांनी मान्य केली नाही. साक्षीदार फितुर झाल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा उलट तपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी अभियोग पक्षामार्फत् विचारलेल्या सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

१२) साक्षिदार क्र. १ फिर्यादी आणि साक्षीदार क्र. २ हा पंच साक्षीदार असून त्याने त्याच्या रिपोर्ट आणि त्यांच्या जवाब याच्या विसंगत कथन केल्याने अभियोग पक्षाच्या विनंतीवरुन त्याचा

उलटतपास घेण्याची परवानगी अभियोग पक्षाला देण्यात आली परंतु सदर साक्षीदाराने अभियोगपक्षाला सहकार्य केले नाही. त्यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यामध्ये आरोपीने विद्युत पंप चोरुन नेल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे.

१३) प्रस्तुत प्रकरण हे ०८ वर्षापेक्षा जुने आहे. त्यामध्ये उर्वरित साक्षीदारांना न्यायालयाने वेळोवेळी साक्ष समन्स पाठवले आहे, परंतु ईतर साक्षीदार आणि तपासी अधिकारी यांना हजर करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. अभिलेखाच्या पाहणी वरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये दोषारोप दि.१२.११.२०२५ रोजी स्थापित करण्यात आला होता आणि तेव्हापासून प्रस्तुत प्रकरण हे अभियोग पक्षाच्या साक्ष पुराव्यासाठी नेमण्यात आले आहे. परंतु अभियोग पक्षाला तथा संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांना साक्षीदारांना हजर ठेवण्यास अपयश आले आहे.

१४) अभिलेखावरुन साक्षपुराव्याचा विचार केला असता अभियोग पक्षाने तपासलेला फिर्यादी सा.क्र.१ आणि साक्षीदार क्र. २ हे फितुर झाले आहेत. फिर्यादीने घटनेच्या दिवशी त्याची मोटर पंप चोरीला गेल्याचे नाकारले आहे. त्याचबरोबर साक्षीदार क्र. २ यांनी आरोपीने पोलीस स्टेशनयेथे निवेदन दिल्याचे नाकारले आहे.तसेच त्यांनी निवेदन पंचनामा त्यांच्या समक्ष झाल्याचे नाकारले आहे. साक्षीदार क्र. १ आणि २ यांच्या साक्ष पुराव्या वरुन आरोपीने फिर्यादीच्या शेतातील विद्युत पंप चोरुन नेल्याचे सिध्द होत नाही. स्वतः फिर्यादी फितुर झाल्याने इतर साक्षीदार तपासून अभियोग पक्षास कोणताही लाभ होणार नाही.

१५) आरोपीच्या वतीने घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२९ मान्य करण्यात आला आहे. परंतु फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने संबंधित घटनास्थळ पंचनामाने अभियोगपक्षास कोणताही लाभहोत नाही.

१६) एकंदरीत सा.क्र. १ फिर्यादी आणि साक्षीदार क्र.२ पंच साक्षीदारयांच्या साक्ष पुराव्यावरुन आरोपीने घटनेच्या वेळेस मौजे सातरगाव येथील फिर्यादीचे शेतातील विद्युत पंप चोरुन

नेल्याचे स्थापित होत नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द दोषारोपात नमूद असलेल्या गुन्हा केल्याचे संशयापलीकडे जावून सिध्द होत नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

**१७)** वरील मुद्दा क्र.१ वर नोंदविलेल्या 'नकारार्थी' निष्कर्षांवरुन आरोपीची या खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येण्यात पात्र आहेत. वरील विवेचनावरुन खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आ दे श

०१. आरोपी यांची भारतीय दंड विधान कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

०३. अपील कालावधीच्या समाप्तीनंतर जप्त मुद्देमाल पानबुडी पंप त्याच्या मूळ मालकास परत करण्यात याव.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चे जामीनाची पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

Digitally signed by AMBHORE SHANKAR BABURAO
Date: 2026.08.05 16:42:28 +0530

दिनांक : ०५.०८.२०२६

(एस. बी. अंभोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदगाव खंडेश्वर

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Dongare |
| Court Name | : | Court of J.M.F.C.,Nandgaon Kh. |
| Date | : | 05.08.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 05.08.2026 |
| Judgment uploaded on | : | 05.08.2026 |

x x x x